# कृतिशील स्वयंशिक्षण

शिकणे हा मनुष्याचा जन्मसिद्ध स्वभाव आहे. लहान मुलांच्या बाबतीत तर हे विशेषत्वाने खरे आहे. जन्मापासून ते प्रौढ वयाला पोचेपर्यंत, मुले वेगाने विविध गोष्टी आत्मसात करतात, वेगाने शिकतात. असे शिकण्यासाठी निसर्गानेच, त्यांना, प्रभावीपणे व सातत्याने कार्य करणारी, पंचेंद्रिये बहाल केली आहेत. पंचेंद्रियांच्या सहाय्याने विविध त-हेचे अनुभव आत्मसात केले जातात आणि मेंदूच्या स्तरावर त्यांचा अर्थ लावून, प्रत्येक माणूस, आपली ज्ञानप्राप्ती आपणच करीत असतो. अशाप्रकारे मेंदू हा माणसाचा 'शिकण्या'चा अवयव असतो.

मुलांच्या शिक्षणाचा घनिष्ट  संबंध, आपण, 'शाळेशी किंवा जरा व्यापक अर्थाने सांगायचे तर 'शिक्षणसंस्थे'शी बांधलेला असतो. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा सारा विचार अशा संस्थात्मक शिक्षणाशी मर्यादित केला जातो; ही एक, शिक्षणविचारातील, आणि त्याहीपेक्षा शिक्षणव्यवहारातील मोठी त्रुटी आहे. वास्तविक पाहता, शिक्षणसंस्थेत आपण विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करतो आणि निसर्गत: पाहता, शिक्षण ही एक आपसूक होण्याची गोष्ट आहे. आजूबाजूचे जग आणि शिकू पाहणारी व्यक्ती यांच्या परस्पर संपर्कातून तिचे शिक्षण होत असते. आजूबाजूच्या जगाशी व्यक्तीचा (पंचेंद्रियांकरवी) जोडला जाणारा संबंध हा तिहेरी स्वरूपाचा असतो. एक, निर्जीव वस्तुरूप जग. यात निसर्गनिर्मित व मानवनिर्मित वस्तूंचा समावेश होतो. दोन, सजीव मानवी जग व प्राणी जग; आणि तीन, घडणाऱ्या घटनांचे जग. नैसर्गिक स्वरूपाच्या आणि मानवी जीवनातील घटनांचा यात समावेश होतो. अशा प्रत्यक्ष संपर्कातून होणारे शिक्षण हे प्रत्यक्ष अनुभव घेऊन होणारे शिक्षण असते, अशाप्रकारच्या शिक्षणास, मी, 'जिवंत शिक्षण' असे म्हणतो. जिवंततेत असणारे चैतन्य हे या शिक्षणात असते. प्रत्यक्षात प्रक्रियेत सहभागी होऊन जे अनुभव आपण घेतो ते जिवंत अनुभव असतात, म्हणून अशा जिवंत अनुभवांद्वारे होणारे शिक्षण ते जिवंत शिक्षण, असे आपल्याला म्हणता येईल. या शिक्षणाच्या प्रक्रियेत ज्या विशिष्ट गोष्टीचा अनुभव घेतला जात असतो, त्या गोष्टीच्या विश्वाचाच एक घटक होऊन, शिकणारा, अनुभव घेत असतो; आणि हा अनुभव, व्यक्तीचा त्या विशिष्ट विश्वातील घटक-उपघटकांशी बांधल्या जाणाऱ्या (नाते) संबंधांतून, निर्माण होत असतो. इथे ज्ञाननिर्मितीचे मूळ असते, आणि त्याद्वारे ज्ञानाचे झाड मेंदूत तयार होत असते.

शाळा ही विशिष्ट मर्यादा असलेली अशी एक व्यवस्था असते. विशिष्ट स्तरांवर परस्पर संबंधांनी बांधलेली अशी ही व्यवस्था असते. विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक (खाजगी वा सरकारी), पालक हे मुख्यत: या व्यवस्थेचा भाग असलेले मानवी घटक. त्यांच्यातील हेतूपूर्ण परस्पर संबंध हा एक महत्त्वाचा भाग. याशिवाय शाळेची इमारत, मैदान, संडास-मुत्री, पाणी, (असल्यास) बाग, परसबाग, शेती,

अन्य व्यवसाय शिक्षण सोयी हे व अशा अन्य सुखसोयी हे शालेय वातावरणाचे, पण अमानवी घटक असून त्यांपैकी प्रत्येकाशी, शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संपर्कक्रिया चालू असतात. शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम, शिकण्याच्या पद्धती आणि उपलब्ध स्वयंशिक्षणाची साधने यांच्याशी बांधला जाणारा संबंध हा, त्याच्या शिक्षणातील अपरिहार्य असा पण प्रभावी घटक असतो. शिक्षणासंबंधीच्या विविध घटकांमधील हे परस्परसंबंध शिक्षणाच्या दर्जावर परिणाम करीत असतात. हे संबंध जवळिकीचे, मानवी घटकांमधील परस्पर विश्वासाचे, सहजसंपर्क साध्य करणारे आणि विद्यार्थ्यांमध्ये भावनिक सुरक्षितता निर्माण करणारे असे असावेत, अशी चांगल्या, दर्जेदार शिक्षणाची प्राथमिक अट असते.

शिक्षणातील संबंध याच्या इतकाच प्रत्यक्ष वर्ग शिक्षणातील दुसरा महत्त्वाचा भाग असतो तो म्हणजे शिकण्याची घडून येणारी प्रत्यक्ष प्रक्रिया होय. वर्गात घडून येणाऱ्या शिक्षणप्रक्रियेचे स्वरूप हे कोणत्या प्रकारची शिक्षणपद्धती वर्गांमधून अवलंबिली जात आहे, यावरून ठरत असते. आधुनिक शिक्षणशास्त्र व त्याला आधारभूत असणारे मज्जामानसशास्त्र किंवा वेगळया शब्दांत अलीकडे सांगितले जाते त्याप्रमाणे, 'मन- मेंदू-शिक्षण' शास्त्र हे शिक्षणपद्धतीला नेमके आणि नेटके स्वरूप देण्यात यशस्वी ठरले आहे. दोन नियम, नव्या शिक्षणशास्त्राने आपल्याला बहाल केले आहेत. एक, स्वयंशिक्षण आणि दोन, कृतिशील शिक्षण. एक, 'दुसऱ्या कुणी' शिकवून शिकण्यापेक्षा स्वत:च्या प्रयत्नांतून शिकणे अधिक उपयुक्त ठरते. आणि दोन, स्वत: जे शिकण्याचे प्रयत्न करायचे ते प्रत्यक्ष करून शिकण्याचे असे प्रयत्न असावेत. अशाप्रकारच्या शिक्षणपद्धतीस 'रचनावादी' शिक्षणपद्धती म्हणून संबोधले जाते.

रचनावादी शिक्षणपद्धतीत, शिकणारी व्यक्ती ही शिक्षणव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असते; आणि शिक्षणासाठीची साऱ्या (परस्परसंबंधित) घटकांची रचना ही शिकण्याचे काम सहजतेने पण प्रभावी रीतीने होऊ शकेल, अशी करावयाची असते. तसेच सारी शिक्षणव्यवस्था शिकण्याच्या नैसर्गिक प्रक्रियेस अनुसरून , आवश्यक त्या संधी शिकणाऱ्या व्यक्तीस पुरविणारी अशीच असते. या विचारांना मोठा सैद्धांतिक आधार पुरविला आहे तो, ज्ञाननिर्मितीविषयीच्या मूलभूत विचाराने. ज्ञान हे व्यक्तिनिष्ठ आणि व्यक्तिसापेक्ष असते; कारण, प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या ज्ञानाची निर्मिती, बांधणी, रचना, ही स्वत:च करीत असते. त्यासाठी आवश्यक ते सहाय्य इतरांकडून जर घेतले जाते.

**कृतिशील स्वयंशिक्षण**

'कृतिशील स्वयंशिक्षण' हे रचनावादी शिक्षणपद्धतीचे बोधवाक्य मानता येईल.'कृतिशील स्वयंशिक्षणाच्या संधी देणारी ती शाळा' अशी 'रचनावादी शाळे'ची व्याख्याही करता येईल. कृतिशील स्वयंशिक्षणाचे हे तत्त्व प्रत्यक्ष शाळेच्या आणि शाळेतील प्रत्येक वर्गाच्या दैनंदिन व्यवहारात उतरवण्याची काही

सूत्रे मांडता येतील. अर्थातच, ही सारी सूत्रे, प्रत्यक्ष शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संदर्भातच मांडली पाहिजेत, कारण, शाळेतील-वर्गातील शिक्षणाचा केंद्रबिंदू तोच आहे, असे आपण यापूर्वीच सांगितले आहे. ही सूत्रे खालीलप्रमाणे आहेत:

**१. स्वत: शोध घेऊन शिकणे.**

शालेय वर्गांतून शिकताना, आपण विविध विषयांच्या शिक्षणाला महत्त्व देतो. विषयांच्या इयत्तावार विशिष्ट अभ्यासक्रम, त्यांवर बेतलेली क्रमिक पुस्तके, संदर्भासाठी वाचनसाहित्य, इंटरनेटवरील माहिती या साऱ्यांतून आवश्यक ती माहिती विद्यार्थ्यांना मिळू शकते. या विविध स्रोतांतून सुसंगत माहिती जमा करण्याचे काम, हेही शोध घेण्याचेच वरवरचे कामपण असते. परंतु शिक्षणात खरा शोध विद्यार्थ्यांना घ्यावा लागतो तो त्या पलीकडचा. हा शोध तीन स्तरांवरचा असतो. एक, मिळालेल्या माहितीचा अर्थ लावण्यासाठी घ्यावा लागणारा शोध. हे नव्याने मिळालेल्या माहितीचा स्वत:चा असा अर्थ लावण्याचे काम करताना, नवी माहिती आपल्या आधीच्या, म्हणजे पूर्वज्ञानाशी जोडून करावे लागते. पूर्वज्ञानाचा शोध घेणे हे एक, शिकण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाचे काम असते. दोन, शिक्षणात माहितीपेक्षा संकल्पना समजावून घेण्याचे जटील असे काम विद्यार्थ्यांना हरघडी करावे लागते. त्यासाठी आशयानुरूप संकल्पनांचा शोध घेणे, हे एक विशेष प्रकारचे काम असते. तीन, प्राप्त झालेल्या संकल्पना समजावून घेण्यासाठी त्यांची व्यवहारातील अनुभवाच्या गोष्टींशी सांगड घालावी लागते. अशी सांगड घालण्यासाठी अर्थातच व्यवहारात उदाहरणे धुंडाळावी लागतात. त्यांचा शोध घ्यावा लागतो. ही शोध घेण्याची प्रक्रिया इतकी महत्त्वाची असते की 'शोध घेते ते शिक्षण' अशीच शिक्षणाची व्याख्या मी एकेठिकाणी केली आहे.

**२. वस्तू, साधने हाताळून शिकणे.**

कोणत्याही बौद्धिक कामांत शारीरिक क्रियेचा सहभाग उपयुक्त आहे, असा मज्जामानसशास्त्राचा निर्वाळा आहे. स्वत: हाताने केलेली गोष्ट चांगली लक्षात राहते, असा आपला नेहमीचा अनुभवही आहे. लहान वयात तर प्रत्येक गोष्ट हाताळून पाहण्याचा मुलांचा स्वभाव असतो.

बऱ्याचदा शालेय पातळीवरील शिक्षणात, हाताने काही वस्तू, साधने हाताळून, काही कृती करीत करीत शिकले तर त्यातील बारकावे, त्यातील संकल्पना समजणे सोपे जाते; एवढेच नव्हे तर, अशा संकल्पना किंवा गुंतागुंतीच्या अमूर्त गोष्टींचा उलगडा चांगला होऊन, शिकलेले दीर्घकाळ स्मरणांत राहते. अलीकडे भाषा, गणित वा अन्य विषयांतील संकल्पना समजावून घेण्यासाठी विविध प्रकारची शैक्षणिक साधने उपलब्ध

असतात. अशी साधने वापरून होणारे, म्हणजे साधनांधारित शिक्षण ही प्रामुख्याने बालशिक्षणात व प्राथमिक शिक्षणात वापरली जाणारी प्रभावी पद्धती आहे.

**३. समवयस्क सहकाऱ्यासमवेत शिकणे.**

आपले स्वतःचे शिक्षण जरी वैयक्तिक पातळीवर होत असले, तरी ते इतर समवयस्क विद्यार्थ्यांसमवेत केले तर अनेक कारणांनी ते प्रभावी होते. मुख्य म्हणजे, लहान गटात बसून जेव्हा विद्यार्थी शिकतात तेव्हा ते परस्परांची मदत घेत, परस्परांना सहाय्य करीत, एकमेकांचे प्रश्न सोडवीत शिकतात; न कळतच सर्वच एकमेकांना शिकण्याच्या बाबतीत, विषय येण्याच्या बाबतीत समान स्तरावर आणण्याचा प्रयत्न करतात; आणि त्याचवेळी एक सहकाराची भावनाही त्यांच्यात निर्माण होते. सहकाराचे मूल्य भावीकालासाठीचे एक अनिवार्य असे मूल्य आहे! समानतेची भावना, परस्परांविषयीची आत्मियता या शिकवून न येणाऱ्या गोष्टी मुले परस्परांच्या सहवासांत आत्मसात करतात. असाही अनुभव आहे की, एकाच वर्गातील विद्यार्थ्यांच्या आकलनात आणि म्हणून त्याच्या कामगिरीत पडणारे अंतर, गटपद्धतीत शिकणाऱ्या मुलांच्या बाबतीत खूप कमी होते.

**४. अन्य प्रौढ व्यक्तींच्या संपर्कातून शिकणे.**

शाळेतील शिक्षकांकडून तर मुले शिकतातच. पण त्याचबरोबर नजिकच्या समाजातील अन्य प्रौढ व्यक्तींच्या संपर्कातून, मुले, शालेय विषयज्ञानाला, सर्वसामान्य ज्ञानाची जोड देऊन आपले शिकणे अधिक दमदार करतात आणि विस्तारतात. मुले शाळेव्यतिरिक्त कितीतरी वेळ आजूबाजूच्या समाजात वावरत असतात; आणि त्यांतून काही ना काही अनुभव ग्रहण करीत जातात. या सर्व अनुभवांत, घरातील प्रौढांचे अनुभव हे लहान मुलांच्या बाबतीत अधिक प्रभावी ठरतात. सहजपणे प्राप्त होणारे अनुभव हे 'सहज शिक्षण' होय. परंतु जाणीवपूर्वक नवनवे अनुभव शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यासाठी, शास्त्रशुद्ध नियोजन करावे लागते. उदाहरणार्थ, प्रौढांच्या भावनिक, बौद्धिक वागणुकीचे अवलोकन करणे, विशिष्ट विषयांवर विशिष्ट व्यक्तींशी संवाद साधणे, चर्चा करणे, मुलाखती घेणे, घडणाऱ्या महत्त्वाच्या सामाजिक घटनांवर इतरांची मते जाणून घेणे आणि या सगळया अनुभवांवरून स्वतःचे विचार निश्चित करणे; अशाप्रकारच्या विविध संधी विद्यार्थ्यांना पुरवणे हे, वर्गजीवनाचा समाजजीवनाशी संबंध जोडून शाळांना करता येणे शक्य असते.

**५. घडणाऱ्या घटनांतून अनुभव घेऊन शिकणे.**

संपूर्ण मानवी जीवन विविध घटनांनी भरलेले असते. या घटना वैयक्तिक जीवनातील असतील अथवा समाजजीवनातील असतील, त्या घटना नैसर्गिकरीत्या घडलेल्या असतील अथवा मानवनिर्मित असतील, त्यांच्याकडे जाणीवपूर्वक पाहणे, याचे शिक्षण मुलांना मिळावे लागते. घटना घडणे → त्यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीतीने सहभागी होणे → जाणीवपूर्वक अनुभव घेणे → त्यांवर विचार करणे → व आपल्या प्रतिक्रिया नोंदवणे अशी ही शैक्षणिक मालिका असू शकते. अशा शिक्षणांतून, विद्यार्थी, इतरांच्या भावनांशी समरस व्हायला, सहानुभूती घ्यायला, विचार करायला, अपेक्षित वैयक्तिक व सामाजिक कृती करायला शिकतात. व्यक्तीजीवनाला सामाजिकतेचे परिमाण प्राप्त होण्याचे भरीव कार्य यांतून घडून येते. विद्यार्थी अधिक प्रबुद्ध होतात.

व्यक्तीला प्रबुद्ध करणे, व्यक्तींचे भावी जीवन समृद्ध-संपन्न करणे, हे जर शिक्षणाचे उद्दिष्ट असेल तर ही सूत्रे लक्षात घेऊनच शाळांनी आपले शिक्षण व्यवहार ठरवावे लागतील. शिक्षण हे अंतिमत: विद्यार्थ्यांच्या भावीकालातील जीवनाची तयारी करून देणारे असेल तर त्याची तयारी विद्यार्थ्यांच्या सभोवतालच्या जीवनातील अनुभवांतूनच करावी लागते. त्याची विशिष्ट योजना करावी लागते, ती, अर्थातच बदलत्या परिस्थितीनुसार, सातत्याने नित्यनूतन करावी लागते.

❖